

|| ॐ ऐं ह्रीं क्लीं मनुदेव्यैं विच्चै ||

| |
|---|
| श्री मनुदेवी मंत्र |
| श्री मनुदेवी स्तोत्र |
| श्री मनुदेवी - मंगल आरती |
| सातपुडा निवासिनी श्री मनुमातेची आरती |

|| ॐ नमो भगवती मनुमाते नमः ||

| श्री मनुदेवी मंत्र |
|---|
| गिरीवास प्रिया सिध्दां । भक्त कल्याण कारिणिम् ।<br>वन्दे श्री मनुदेवी स्वाम् । मनोवांच्छित दायिनिम् । |

## ॥ श्री मनुदेवी स्तोत्र ॥

श्री मनुदेवी नमस्तुभ्यं सुरेश्वरी
भक्त प्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं जगदेश्वरी ॥ १ ॥

सप्तालये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं सर्वदे
सर्वभूत हिताषार्थ क्रुपादृष्टी सदा करु ॥ २ ॥

सिध्दीदात्रि मनुपूत्री मनुदेवी नमो नमः
निर्विघ्न कुरुमे माते शुभ कार्येषु सर्वदा ॥ ३ ॥

जगन्माते नमस्तुभ्यं करुणाकरी
दया वती नमस्तुभ्यं विश्वेश्वरी नमोऽस्तुते ॥ ४ ॥

नमो नमस्ते देवी अखंड सौभाग्य वुध्दे
प्रसीद मम अंब कृपया पाहि माम् सदा ॥ ५ ॥

जगदंब नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे
दयावति नमस्तुभ्यं दुर्गती नीनी नमोऽस्तुते ॥ ६ ॥

सर्व स्वरुंप स्वरुंप सर्वो सर्व शक्ती समन्विते
मनुदेवी नमस्तुभ्यं मोक्ष दायिनी नमोऽस्तुते ॥ ७ ॥

सातपुडा वासिनी देवी नम्स्त्रेतोक्य धारिणी
कृपा दृष्टे नमस्तुभ्यं रक्षमाम् शरणागतम् ॥ ८ ॥

## श्री मनुदेवी - मंगल आरती

|| १ ||जयदेवी जयदेवी जय श्री मनुमाते
आरती ओवाळीतो सद् भावे तुते ||जयदेवी - जयदेवी

|| २ ||सातपुडा निवासिनी कुलस्वामिनी मनुआई
वारिसी विघ्ने सत्वरी भक्ताची तू पाही ||जयदेवी - जयदेवी

|| ३ ||भक्तीभावे तुजला जे कोणी भजती
प्रसन्न होऊनी देसि संतती, सुख, संपत्ती ||जयदेवी - जयदेवी

|| ४ ||आदि अनादी अनामय तु अविनाशी
श्री देव श्रीगणो तव सानिध्यासि ||जयदेवी - जयदेवी

|| ५ ||मनुदेवी, मनुआई, मनुबाई तुज वंदती
तारि तु आता भक्त शरण तुजी ||जयदेवी - जयदेवी

|| ६ ||चैत्र शुद्ध अष्टमी अतिप्रिय तुजी
करुणा कर तु सांभाळी बाळासि ||जयदेवी - जयदेवी

|| ७ ||पाहुनी निसर्ग रम्य तुझा अतिदिव्य परिसर
मन रमते तुजपाशी शरण तवं किंकरा ||जयदेवी - जयदेवी

|| ८ ||भक्त पावना शांत स्वरूपा श्री मनुआई
ठाव दे भक्तासी सत्वरी तव पायी ||जयदेवी - जयदेवी

|| ९ ||धुप, दीप, नैवेद्य आरती सद् भावे तुज करितो
अनन्य होऊनी भावे तुज मी नमितो ||जयदेवी - जयदेवी

|| १० ||सातपुडा निवासिनी इहपर सिध्दीप्रदे
चंद्रभागा सुत चरण शरण माते वर दे ||जयदेवी - जयदेवी

## सातपुडा निवासिनी श्री मनुमातेची आरती

|| जय देवी जय देवी, जय मनुमाते ||
आरती ओवाळीता, प्रसन्न मन होते
|| आदिशक्ती देवी तू गिरिमाता ||
|| तुजविण या जगती, अन्य नसे त्राता ||
जय देवी जय देवी (१)

|| नाना विधरुपे माते तू घेसी ||
|| सदाभक्ता संकटी, धावोनी तू येसी ||
जय देवी जय देवी (२)

|| नाना देशी नाना अवतार घेसी ||
|| नाना नामे तुज, भक्तजन देती ||
जय देवी जय देवी (३)

|| जैसी त्याची भक्ति तैसा वर देसी ||
|| सदाभक्ता कारणे, सातपुडा येसी ||जय देवी जय देवी (४)

|| मनुमाता, मनुबाई भक्त तूज म्हणती ||
|| मी-तू-पण विसरोनी तूजला ते नमिति ||
जय देवी जय देवी (५)

|| सत्कर्मी मति असू दे ज्ञानहि देई सदा ||
|| जगन्नाथ सुत प्रार्थितो तुजला ||
जय देवी जय देवी (६)

## ।। श्री मनुदेवी स्तोत्र ।।

श्री गणेशाय नमः । ॐ नमोजी गणनायका । एकदंता वरदायका स्वरूप सुंदरविनायका । आता नम्र ब्रम्हकुमारी ।। हंसारूढ वाघेश्वरी विणा शोभे दक्षिणकरी । विजयी मुर्ती सर्वदा ।। १ ।। नंतर नमिलो कुलदेवता । मनुमाई जगन्माता । जी विश्वाची अधिष्ठाता । जिच्याने लाभे सुखसंपदा ।। २ ।। नमन माझे गुरुवर्या । प्रकाशरुप तू स्वामिया स्फुर्ती द्यावी ग्रंथ वदावया । जेण श्रोतया सुख वाटे । ३ । नमन माझे संतजना । तैसेची बुधजना । ज्याचेनी सुख लाभ सकलजना । कल्पवृक्षापरी । ४ । असो जिचा हा ग्रंथ जाण । त्या मातेसी करुनी नमन । करीतसे ग्रंथा रंभन । प्रमभावे करुनिया । ५ । श्रोतियांसी नमस्कार । माझा असो निंरतर । सर्वत्र होवुनी आदर । न्युन ते पुर्ण करावे । ६ । मनुमातेचे मंगल स्त्रोत । स्मरिता तिचे महात्मय पवित्र । पुष्पामालेतुनी ओविले एकत्र । भालचंद्रे रचिली । ७ । मनुमातेची महती । सर्व जगाची जी - गंगोत्री । जिच्याने लाभे सुखसंपत्ती । भक्त संरक्षणे घेई नामे । ८ । शक्ति माता ती सर्वस्थानी । एकटी चित्ती ब्राम्हणी । तालू स्थानी नारायणी । अमृतसर विद्यापुरी । ९ । दूर्गानामे वेणुग्रामी । कालीकलयतली वंगधामी । परमहंस विवेक संगमी । शक्ती तीच परंपरा । १० । श्रीविद्या ती श्रीनगरी । भारती तीची वाचापुरी । अंबा रत्नाचल करवरी । क्षेत्र बद्रीहुनी येशी । । ११ । रेणुकामाता ती माहुरी पुण्यफल प्रदे नर्मदातिरी । सह्याचली अतीसूंदरी । संवंदती ग्रामपैल ती । १२ । भवानी माय तुळजापुरी । बसली शिवह्रदयांतरी । कामिनी ती विश्वंभरी मम ह्रदयी राही स्थिर । १३ । तिच सीमा मंदोदरी । अहिल्या तारा नि द्रुपदकुमारी । राही रुख्मीनी वज्रेश्वरी । अवतार असे वज्र-नारीचा । १४ । धुळे ग्रामे प्रगटे एकविरा नामे । सातपुड्यात वसे मनुमाता नामे । अन्न्पुर्णा नि संतोषीमाता प्रसन्ने । अनंत रुप वर्णिया शब्द अपुरे । १५ । एकेक ते देवस्थान । स्वयंभू पूण्यक्षेत्र महान । करिता स्मरण घेता दर्शन । इच्छा पुर्ण होतसे । १६ । मनुमाता ज्यांचे कुलदैवत । जाज्वल्य आणि जागृत । प्रसन्न होता मनोरथ । सफल संपुर्ण होतील । १७ । जळगांव जिल्ह्यात आडगांवी । जाऊनी जिथे प्रचिती पहावी । मनुमातेची थोरवी । उपासका कळेल । १८ । दृष्टी फेका सभोवार । तिथे एका डोंगरावर । आहे स्थान मनोहर । मनुमाता नामे प्रसिध्द । १९ । मनुमातेची स्थापना कोण्या काळीची असेना । परि शंका नसावी मना । तिच्या जागृतीची ।। २० ।। कुलदैवत अनेकांचे । रक्षण करिती भक्तांचे । नाम घेता मातेचे । विघ्न सारी टळतात । २१ । अनेक जाती जमाती मनुमातेचे भक्त असती । परि एकत्र नांदिती आशिर्वाद मातेचा त्यांना । २२ । साडेतीन पीठ देवीची । सर्वत्र ख्याती असे ज्यांची । मनुमाता बहिण सर्वांची । शंका नसावी कुणा । २३ ।

पहिले माहूर गडावरी । दुसरे कोल्हापुरी नगरी । तिसरे तु ळजापुरी । सप्तशृंग अर्धपीठ प्रसिध्द । २४ । मनुमाते समवेत । बहिणीची हास्यमुद्रा विलसीत । शेजारी गजानन आंनदात । दृश्य विहंगम भासे । २५ । पायरया उतरत क्षणी । धबधबा लक्ष वेधितो नयनी । आंनदाची ही पर्वणी । न मिळे स्वर्गी ही । २६ । मोठ्या शिळेचा महिमा । मातेच्या भावाची प्रतिमा । त्यामु ळे त्या स्थाना तिर्थत्व प्राप्त जाहले । २७ । मातेशी अतिप्रिय सावळे । विटाळ जाणे टाळावे । पथ्य हेची समजावे । सांगणे श्रोते हो । २८ । एका अबलेले काय केले । विटाळ वेता सांगणे टा ळले । परी तेची भोविले । गांधील माशांनी पीडा दिली । २९ । लक्षात येता क्षणी । पळता सर्व जणी । पूनश्च स्नान आटपोनी । घेती दर्शन मातेचे । ३० । मधु जोशी नामे भक्तास । अनुभव येई खास । रक्तदाबाचा त्रास पन्नीस । परी माते कृपेने । चालुनी जाती दर्शनास । ३१ । एक पतीव्रता साध्वी होती । आख्यायिका तिची सांगती । दोन्ही पती पत्नी सुखे नांदती । मातेची आराधना करती । ३२ । भगवंताच्या कृपेने । त्यांना नव्हते काही उणे । परि त्यांच्या प्रारब्धाने निपुत्रिक ती होती । ३३ । अनेक केली व्रत वैकल्ये नवस-सायाही केले । परि इच्छीत साध्य नाही झाले । अनेक वर्ष त्यांचे । ३४ । मातेशी साकडे घातले । पुत्र रत्न मला का न झाले । जे समयी धबधबा चाले बाळासमवेत उडी घेईन । ३५ । भक्तावरती श्रध्दा फार । झाली प्रसन्न अबलेवर । दुर्दैवाचा चक्काचूर लाभ होई पुत्र रत्नाचा । ३६ । प्रतिज्ञेप्रमाणे जाऊनी पठारी । अबलेची वृत्ती बहु करारी बाळासमवेत ऊडी मारी । परी निर्वीघ्न राहती । ३७ । महारोग होता कुळकर्ण्यांना । भोगिती दारुण यातना । जाती मातेच्या दर्शना । मुक्काम तिथे ठोकीती । ३८ । एके दिवशी काय घडले । मातेने स्वप्नी दर्शन दिले । स्वप्नी आदेश केले वृक्ष पालवी शरिर चोळावी । ३९ । तै प्रमाणे केले । नवल ते घडले । रोगमुक्त झाले । प्रसन्न होता भगवती । महारोग पळती । ४० । चंद्राभागाबाई गांधालीकर । पडून होत्या पलगांवर । येत नव्हत्या शुध्दीवर डाक्टरी उपाय थकले । ४१ । मुलगा करी मातेशी प्रार्थना । वाटू दे बरे मातोश्रींना । येऊ तुझ्या दर्शना म्हणोनी विभूती लावली । ४२ । मातेची ते समयी येई प्रचिती । चंद्रभागाबाई शुध्दीवर येती । पुन्हा कधी आजारी न होती । ठेवीता श्रध्दा दु:खे आपोआप पळती । ४३ । मुलगा नामे महिपंत । असतो फागणे ग्रामात । फिटे ग्रासी अल्पवयात । मातापिता असती चिंतेत । ४४ । दांपत्ये मातेसी विनवीती । जर का बाळासी फीट जाती । तुझ्या दर्शनाची महती प्रतिवर्षी आम्ही घेवु । ४५ । मातेचा महिमा । जाती फीट त्या क्षणा । दांपत्याची ती करुणा । कारणे लागती । ४६ । फागणे गावाची दुसरी कथा । श्रोतेहो शांत चित्तेने एका । कमलाबाईची ती व्यथा । मनुकृपे दूर झाली । ४७ । मातोश्री कमलाबाईंना । होत्या चार कन्या । पुत्राची अपेक्षा त्यांना । रात्रंदिवस होती । ४८ । प्रचंड असे इच्छाशक्ती ।

मातेशी सांकडे घालती । अनंते अडचणी येती । परी मातेकृपे पुत्र लाभ झाला । ४९ । कमलाबाई चौधरी । जेथे दारीद्र्य वास करी । मातेंची कृपा त्यांचेवरी । धन्यधान्य संपत्ती प्राप्त झाली । ५० । चैत्र शुध्द पक्षात । सातपुडा परिसरात यात्रा भरते थाटात अष्टमी नवमी दिवस पाहुनी । ५१ । काहींच्या चाली रिती संक्रांती पोळा पाळीती । ते समयी दर्शन जाती । पाळावे नियम घराण्याचे । ५२ । राहती मातेच्या लिला फार । भक्ती परी लांबणार । शब्द अपुरे पडणार । करावी आशीर्वादाची याचना । ५३ । पुजा करावी यथासांग । जाती सर्व भोग । धरु नये अती लोभ । हिच विनंती श्रोत्यांना । ५४ । पुजेसाठी शुचिर्भूत होऊनी । आंनदी वृत्ती ठेवूनी । नतमस्तक होऊनी । संकल्प सोडावा । ५५ । आवाहन प्रार्थना करीत । साक्षात दिसे मनुमाता । आईचे स्नान घालीत । वस्त्र - हळद कुंकु, फुले अर्पावी । ५६ । धूपदीप ओवाळूनी । पूरणाचा नैवेद्य अर्पूनी । मनोभावे नमस्कारोनी । आरती संपता प्रदक्षिणा घालावी । ५७ । तदनंतर करावी प्रार्थना । सांगावी मनोकामना । आशिर्वादाची करावी याचना । व्रत महात्म्य वाचावे । ५८ । आता परीसावी फल प्राप्ती । कैसे मिळे होता पूजा आरती । शांत ठेवूनी वृत्ती । सावधान होवूनी एकावे । ५९ । या माते स्तुतीचे जाण । भावे करीता श्रवण पठण । सर्व बाधा निरसून कार्यसिध्दी होतेसे । ६० । धूप दिप नैवेद्य आरती । जे मातेसी नित्य करीती । त्या प्राणीया सुख संपत्ती मिळेल सर्वदा । ६१ । जे मातेस विनवीती। मनोभावे सेवा करीती । जवळ बैसुनी प्रार्थीती । ते सदा सौभाग्य पावती । ६२ । माता स्मरण निशी दिनी । तो वर्चस्व गाजवी या भूवनी । त्याचीया सत्त्वाची खाणी । उध्दारली आहे । ६३ । कल्पवृक्षाची हि छाया । होतेसे तृप्ती पावलीया । संसारी राहतसे हि छाया । असु द्यावे हे बोल अंतरी । ६४ । ठेवूनी गाढ विश्वास । ठेवीते ती भक्तास । पूरवूनी धनास । सुखी करते सर्वांना । ६५ । इतिश्री सुरभरीत । मनुमाता महात्म्य समाप्तम । श्री लक्ष्मी नारायणार्पणमस्तु श्री राधाकृष्णार्पणमस्तु । शुभंम भवतु ।६६।

**टिप:** *भाविंकाच्या विनंतीनुसार देवीवर* ***अभिषेक पूजा*** *करण्याची सोय आहे. हि अभिषेक पूजा भाविकांनी म्हटलेल्या विशिष्ट दिवशी त्यांच्या नावाने करण्यात येईल. त्यासाठी संस्थेशी संपर्क साधावा.*

## - संपर्क -

सातपुडा निवासिनी श्रीक्षेत्र मनुदेवी सेवा प्रतिष्ठान, आंडगाव

ता. यावल  जि. जळगांव  आंडगाव 425125 महाराष्ट्र

**फोन** 91-2582-267452

**Web:** www.manudevi.com

**E-mail:** info@satpudamanudevi.org